6वी भारत-कतार परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत

भारत-कतार परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची (FOC) 6वी फेरी नवी दिल्ली येथे 9 ऑक्टोबर 2026 रोजी पार पडली. या सल्लामसलतीचे सह-अध्यक्षपद परराष्ट्र मंत्रालयाच्या सचिव (सीपीव्ही आणि ओआयए) श्रीमती श्रीप्रिया रंगनाथन आणि कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे सरचिटणीस महामहिम डॉ. अहमद हसन अल-हम्मादी यांनी भूषवले.

2. सल्लामसलती दरम्यान, उभय बाजूंनी राजकीय संबंध, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, वाणिज्य दूतावास व्यवहार, शिक्षण, संस्कृती आणि नागरिक परस्पर संबंधांसह द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण विस्ताराचा आढावा घेतला. त्यांनी पश्चिम आशियातील घडामोडींसह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि बहुपक्षीय मुद्द्यांवरही विचारविनिमय केला.

3. भारत आणि कतार यांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या घनिष्ठ आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत. अलीकडच्या काळात, बहुआयामी धोरणात्मक भागीदारी सर्व क्षेत्रांमध्ये अधिक दृढ होत गेली आहे. कतार मधील मोठा भारतीय समुदाय दोन्ही देशांमधील चैतन्यदायी दुवा म्हणून काम करतो.

4. उभय बाजूंनी परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीची पुढील फेरी दोहामध्ये परस्पर सोयीस्कर तारखेला आयोजित करण्यास सहमती दर्शविली.

नवी दिल्ली

09 ऑक्टोबर 2026